**गजानन शंकर नरवाडे वि. महाराष्ट्र शासन**

(CNR NO. MHBU20-000087-2026)

# नि.क्र. १ खाली आदेश

## (पारीत दिनांक २० मार्च २०२६)

**०१]** अर्जदार – **गजानन शंकर नरवाडे** याने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८३ अन्वये पोलीस ठाणे, लोणार येथील अपराध क्र. ४३३/२०२५, कलम ६४(१), ६४(२)(के), ६४(२)(एम), ६९, ३५१(२) सह कलम ३(५) भारतीय न्याय संहिता खालील प्रकरणात नियमित जामीन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

**०२]** अभियोग पक्षाच्या कथेनुसार पीडीता ही दोन्ही डोळ्यांनी अपंग असून, दिनांक २५.०९.२०२५ ते दिनांक २३.१०.२०२५ दरम्यान आरोपी क्र. २ गजानन शंकर नरवाडे याने पीडितेला आरोपी क्र. १ तुकाराम पांडुरंग माने याचे सोबत लग्न लावुन देण्याचे आमीष दाखवून तिला घरून कोपरखैरणे, मंबई येथे बोलावुन घेतले. आरोपी क्र. १ याने तिच्या सोबत लग्न करणार, असे सांगुन वारंवार तिच्या इच्छेविरूद्ध जबरीने शारीरीक सबंध केले. तसेच, आरोपी क्र. २ ने सुद्धा पीडितेला तिचे आरोपी क्र. १ सोबत लग्न लावुन देण्याचे आमीष दाखवले व तिच्यासोबत शारीरिक सबंध करून तिचे लग्न लावुन दिले नाही. आरोपींनी पीडितेला झालेल्या प्रकाराबद्दल कोणाला काही एक सांगितल्यास जिवाने मारण्याची धमकी दिली. पीडितेच्या बयाणावरून पोलीस ठाणे, लोणार येथे आरोपींविरूध्द अपराध क्र. ४३३/२५, कलम ६४(१), ६४ (२)(के), ६४(२)(एम), ६९, ३५१ (२) सह कलम ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

**०३]** अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. ए. ए. भगत यांनी युक्तिवाद केला की, घटना ही दिनांक २५.०९.२०२५ ते दिनांक २३.१०.२०२५ दरम्यानची आहे. फिर्याद ही १० दिवस उशिरा दिनांक ०३.११.२०२५ रोजी दाखल करण्यात आली. पीडित ही मिसींग असल्याची फिर्याद अगोदर देण्यात आली होती. दिनांक २५.१०.२०२५ रोजी पीडित स्वतः हजर झाल्याने दिलेली मिसींग फिर्याद बंद करण्यात आली. त्यानंतर विचारपूर्वक ही खोटी फिर्याद दाखल करण्यात आली. पीडितेचे बयाणावरून ती स्वतः अर्जदारासोबत जालना येथून

मुंबई येथे गेली. अर्जदाराने पीडितेवर कोणताही शारीरिक अत्याचार केलेला नाही. या प्रकरणात जवळचे व हितसंबंधीत साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आलेली आहे. अर्जदाराच्या पुतण्याने पीडितेची चुलत बहणी कुशावर्ता हिचेविरूद्ध अॅट्रॉसीटी खाली गुन्हा नोंदवला आहे. त्याला शह देण्यासाठी विचारपूर्वक ही खोटी केस करण्यात आलेली आहे. पीडितेचे न्यायालया पुढील बयाण व फिर्याद यामध्ये फरक आहे. अर्जदाराकडून काहीही जप्त करणे बाकी नाही. या प्रकरणात तपास पूर्ण होऊन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. अर्जदाराला दिनांक ०३.११.२०२५ रोजी अटक करण्यात आली. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदार तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. म्हणून अर्जदाराला जामीनावर सोडण्याची विनंती करण्यात आली. अर्जदाराच्या वतीने माननीय राजस्थान उच्च न्यायालय, बेंच जोधपूर यांचे **S.B. Criminal Miscellaneous III Bail Application No.** 13690/2025, **Raja Ram S/o Rameshwardas Vaishnav Vs. Union of India, Through Special Public Prosecutor, Central Narcotics Bureau, Chittorgarh (Rajasthan)** या न्यायनिवाड्यांवर भीस्त ठेवण्यात आली.

०४] याउलट, विद्वान सरकारी वकील श्री. एस. एम. खत्री यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, पीडितेच्या अपंगत्वाचा फायदा घेऊन अर्जदाराने तिच्यासोबत बळजबरीने शारीरिक संबंध केले. अर्जदार व पीडित एकाच गावातील रहिवासी आहेत. त्यामुळे अर्जदाराला जमानत दिल्यास तो साक्षीदारांवर दबाव आणून त्यांना फितूर करू शकतो. अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो अशाच स्वरूपाच्या गुन्ह्याची पुनरावृत्ती करू शकतो. म्हणून अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

०५] पीडित हिने न्यायालया समक्ष सांगितले की, तिला दोन्ही डोळ्याने दिसत नाही. अर्जदाराने तिचे लग्न लावून देतो असे म्हणून तिला एका खोलीवर नेले व तेथे दोन्ही आरोपींनी तिच्यावर तिच्या इच्छेविरूद्ध बलात्कार केला. अर्जदारा तिचे पैसे व मोबाईल चोरी करून पळून गेला. तिला अर्जदारापासून धोका असल्याने अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर

करण्याची विनंती करण्यात आली.

०६]		दोन्ही पक्षाच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने केस पेपरची पाहणी केली असता असे दिसून येते की, पीडित ही दोन्ही डोळ्याने आंधळी असतांना एकटी पांग्रा डोळे येथून जालना येथे गेली. अर्जदाराने तिचे लग्न लावून देतो म्हणून तिला मुंबई येथे नेले. तेथे एका रूम मध्ये तो, पीडित व आरोपी तुकाराम सोबत राहत होते. तेथे पीडित व आरोपी तुकाराम यांच्यात शारीरिक संबंध एक महिन्यापर्यंत आले. अर्जदाराने देखील तिच्यावर एक वेळा शारीरिक संबंध केले असल्याचा आरोप आहे. घटनेचा कालावधी २५.०९.२०२५ ते २३.१०.२०२५ असा असून फिर्याद १० दिवस उशिरा दाखल करण्यात आली आहे. त्यापूर्वीच पीडित हजर झाल्याने व तिचे बयाणावरून तिची मिसींग फिर्याद बंद करण्यात आली आहे. त्यानंतर ८ दिवसांनी उशिरा प्रस्तुत फिर्याद नोंदवण्यात आली आहे. पीडितेचे दिनांक २५.१०.२०२५ चे बयाण, फिर्याद व न्यायालया पुढील बयाणात तफावत आहे. न्यायालया पुढील बयाणात तिने अर्जदारावर रू. ६,०००/-, दोन मोबाईल फोन चोरीचा आरोप लावला आहे. परंतु फिर्याद व दिनांक २५.१०.२०२५ च्या बयाणात तो आरोप अर्जदारावर करण्यात आलेला नाही. संपूर्ण पुराव्यावरून आरोपी तुकाराम यानेच लग्न करतो म्हणून पीडितेसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले असल्याचे दिसून येते. अर्जदाराने तिला आरोपी तुकारामने वागवले नाही तर तो तिला बायको सारखे वागवेल असे म्हणून तिच्याशी एकदा शारीरिक संबंध केले. याउलट, पीडितेचे वैद्यकीय कागदपत्रे पाहता तिच्यावर बळजबरीने शारीरिक संबंध करण्यात आल्याचा पुरावा दिसून येत नाही. वैद्यकीय प्रमाणपत्रातील पार्श्वभूमी ही अभियोग पक्षाच्या कथेच्या विरूद्ध असल्याचे दिसून येते. वैद्यकीय प्रमाणपत्रातील पार्श्वभूमी नुसार पीडित व एक अनोळखी व्यक्ती जालना येथे गेले व तेथून मुंबई येथे ट्रेनने जाऊन एका रूम मध्ये राहिले व त्यांच्यात शारीरिक संबंध आले असल्याचे दिसून येते. त्यामुळे ही विरोधी बाब अभियोग पक्षाच्या कथेबाबत शंका निर्माण करते.

०७]		या प्रकरणातील तपास पूर्ण होऊन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. अर्जदार हा दिनांक ०३.११.२०२५ पासून तुरूंगाधीन आहे. अर्जदाराच्या अनुषंगाने संपूर्ण तपास झालेला असल्याने त्याच्या न्यायालयीन कोठडीची आवश्यकता राहिलेली नाही. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदाराला जामीन

मिळाल्यास तो जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. याउलट, अभियोग पक्षाला असलेली भीती व साक्षीदारांचे संरक्षण कठोर अटी व शर्ती लादून केले जाऊ शकते. म्हणून प्रकरणातील तथ्य परिस्थिती, गुन्ह्याचे स्वरूप, अर्जदाराचे कृत्य व तपासाची स्थिती पाहता, अर्जदाराचा नियमित जामीन अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**– आ दे श –**

**०१]** नियमित जामीन अर्ज क्र. ३६/२०२६ मंजूर करण्यात येतो.

**०२]** अर्जदार – **गजानन शंकर नरवाडे** याला पोलीस ठाणे, लोणार येथील अपराध क्र. ४३३/२०२५, कलम ६४(१), ६४(२)(के), ६४(२)(एम), ६९, ३५१(२) सह कलम ३(५) भारतीय न्याय संहिता खालील गुन्ह्यात, त्याचे वैयक्तिक रू. ५०,०००/– चे बंधपत्र व सदर रकमेचा जामीनदार दिल्यानंतर जामीनावर सोडण्यात यावे.

**०३]** अर्जदाराने अभियोग पक्षाच्या साक्षीदारांवर दबाव आणू नये किंवा साक्षीदारांना कोणत्याही स्वरूपाचे प्रलोभन दाखवून फितूर करू नये.

**०४]** अर्जदाराने पीडीत व तिच्या कुटुंबियांसोबत कोणत्याही प्रकारे संपर्क साधु नये.

**०५]** अर्जदाराने यापुढे कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा करु नये.

**०६]** अर्जदाराने वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास त्याची जमानत रद्द करण्यात येईल.

**०७]** अर्जदाराने जामीनाची पुर्तता न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोणार यांच्याकडे करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.03.23 11:19:55 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – २०.०३.२०२६**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे  शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – २०.०३.२०२६